पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २७/१२/२०१९

# अतिदुर्गम मौजा गुरेकसा येथील महिलांची पाण्यासाठीची पायपीट थांबली

- **मौजा कटेझरी येथील यशस्वी उपक्रमाची मौजा गुरेकसा येथे पुनरावृत्ती.**
- **महिला व शालेय विद्यार्थ्यांनी मानले गडचिरोली पोलीस दलाचे आभार.**
- **गडचिरोली पोलीस दलाकडुन जिल्हा परिषदेच्या बोअरवेलची दुरुस्ती, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य.**

उपविभाग धानोरा अंतर्गत पोलीस मदत केंद्र कटेझरी हद्दीतील अतिदुर्गम अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या मौजा गुरेकसा येथील महिलांना पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागत होती. जीवघेण्या पायपीटीबरोबरच गावाच्या बाहेर असलेल्या ५० फुट खोल विहीरीतुन पाणी काढतांना महिलांची दमछाक होत असे. गडचिरोली पोलीस दलाच्या कटेझरी येथील प्रभारी अधिकारी व जवानांना सदर बाब लक्षात आल्या नंतर त्यांनी महिलांची सदर पायपीट थांबण्यासाठी अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी धानोरा श्री. विक्रांत गायकवाड सा़े. यांच्या मार्गदर्शनाखाली कटेझरी येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी गावाबाहेर असणाऱ्या विहिरीवर सबमर्सिबल पंप बसवून पाणी विहिरीतुन थेट पाईपलाईनद्वारे गावात आणले गावातील उंच ठिकाणी पाण्याच्या दोन टाक्या बसवुन त्यातुन पाईपद्वारे ग्रामस्थांच्या घरासमोर पाणी पुरवठा करता येईल याची खबरदारी घेत अभिनव उपक्रम राबविला.

त्याचबरोबर जिल्हा परिषद शाळा, मौजा गुरेकसा येथील बोअरवेल नादुरुस्त असल्याने येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी निर्माण होत होत्या. सदर नादुरुस्त बोअरवेल गडचिरोली पोलीस दलाने दुरुस्त केल्याने बोअरवेलच्या माध्यमातुन या शाळेत पाणी पूरवठा सुरळीत सुरु झाला.

मौजा गुरेकसा येथील महिलांनी दारात नळाद्वारे आलेले पाणी पाहुन आपल्याला स्वप्नातदेखील आपल्या दारात पाणी येईल असे वाटले नसल्याचे सांगत गडचिरोली

पोलीस दलामुळे हे शक्य झाल्याचे म्हटले. दारात व शाळेत आलेले पाणी पाहुन ग्रामस्थांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.

काही दिवसांपूर्वीच मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी मौजा कटेझरी येथील ग्रामस्थांच्या हाकेला साद घालत अवघ्या १५ दिवसांत मौजा कटेझरी येथील महिलांची पाण्यासाठीची पायपीट थांबवत मौजा कटेझरी येथील घरापर्यंत पाणी पोहचविण्याची व्यवस्था केली होती. आज पुन्हा एकदा मौजा गुरेकसा येथील महिलांचे पाण्यासाठीचे अश्रु पुसण्याचे काम केल्याने गडचिरोली पोलीस दलाने राबविल्याने मौजा कटेझरी, मौजा गुरेकसा परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

मा. पोलीस अधीक्षकांनी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोमके कटेझरी येथील प्रभारी अधिकारी अक्षयकुमार गोरड व कर्मचारी यांचे सदर स्तुत्य उपक्रमाबाबत कौतुक करत अभिनंदन केले आहे.












